
Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

# AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL



Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - II

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

# AJANTA

Improvement

INNOVATION

Creative

Opportunity

AJANTA
PRAKASHAN

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १५. महाराष्ट्रातील आदिवासी स्त्रियांचा दर्जा

**डॉ. संजय काळे**
अर्थशास्त्र विभाग, दिगंबरराव बिंदु महाविद्यालय, भोकर जि. नांदेड.

## प्रस्तावना

जनगणना २०११ नुसार देशातील एकुण लोकसंख्येत आदिवासीं जमातीचे प्रमाण ८.६ असून त्यांच्या ५५७ जमाती आहेत. देशातील अर्ध्यापेक्षा अधिक आदिवासी लोकसंख्या मध्यप्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र, ओडिसा, झारखंड आणि गुजरात या राज्यामध्ये आहे. महाराष्ट्रात आदिवासींचे एकुण लोकसंख्येतील प्रमाण सन २०११ मध्ये ९.३५ होते. राज्यात एकुण ४७ आदिवासी जमाती असून भिल्ल, गोंड, महादेव कोळी, ठाकूर, वारली या प्रमुख आदिवासी जमाती आहेत आदिवासी समूदाय हे देशातील विभिन्न अशा जंगल, डोंगर, दऱ्याखोऱ्यात कोणीही पोहचू न शकणाऱ्या दुर्गम भागात राहतात.

भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रियांना दुय्यम स्थान आहे. हिंदू कायदेही पुरुषप्रधान समाजव्यवस्थेलाच अधिक पोषक ठरणारे आहेत. मात्र आदिवासी पारंपारिक कुटुंबामध्ये स्त्रीयांना महत्वपुर्ण दर्जा असल्यामुळे तिचे स्थान हे वैशिष्टपुर्ण ठरते. सदरील शोधनिबंधात महाराष्ट्रातील आदिवासी स्त्रीयांचा दर्जा यासंबंधीचा अभ्यास करण्यात आला आहे.

## आदिवासी स्त्रियांचा दर्जा

कोणत्याही व्यक्तीला समाजात विवाक्षितकाळी जे स्थान असते त्या स्थानाला दर्जा असे असे म्हणतात. 'दर्जा' या शब्दाची व्याख्या प्रसिद्ध मानववंशशास्त्रज्ञ डॉ. राल्फ लिंटन यांनी केली आहे. तेव्हा समाजात असलेले व्यक्तीचे स्थान म्हणजे त्या व्यक्तीचा दर्जा होय. कोणत्याही समाजाची सामाजिक स्थिती ही त्यांचे आरोग्य, शिक्षण आणि राहणीमानावरुन पडताळून पाहता येऊ शकते. या तिनही बाबींचा विचार आपण आदिवासी स्त्रीच्या अनुषंगाने केला तर, या तिनही पातळीवर आदिवासी स्त्रिया संघर्ष करताना दिसतात. मात्र बऱ्याच अभ्यासावरुन असे दिसून आले आहे की, आदिवासी समाजात स्त्रियांना कमीपणाची वागणुक दिली जात नाही. आर्थिक, सामाजिक आणि धार्मिक कार्यात आदिवासी स्त्रीया पुरुषांच्या बरोबरीने सहभागी असतांत. बहुसंख्य आदिवासी समाजात मुलगा आणि मुलगी यांचा दर्जा सारखाच आहे. वंशाला मुलगाच हवा अशी समजूत दृढ झाली नाही.

## प्रौढ विवाह

आदिवासी समाजात प्रौढ विवाहाची प्रथा आढळते. सर्वसाधारणपणे वयात आल्यावर मुलींचे विवाह होतात. विवाह ही वैयक्तिक बाब आहे अशी आधूनिक विचारसरणी आदिवासी समाजाला मान्य नाही. दोन व्यक्तीच्या मिलनापेक्षा दोन कुटुंबाचे, दोन कुळाचे, दोन गावांचे संघटन हे अत्यंत महत्वाचे मानले जाते. विवाहापुर्वीच्या स्त्री-पुरुष संबंधाकडे आदिम जमातीतील लोक लक्ष घालत नाहीत. विवाह हे सामाजिक बंधन आहे यावर त्यांचा गाढा विश्वास आहे. आदिवासीमध्ये पुर्नविवाहाला

मान्यता आहे. इतर समाजात आढळून येणारी बालविवाहाची प्रथा आदिवासी समाजात दिसून येत नाही. आदिवासी समाजात मुलीचा विवाह वयात आल्यानंतरच केला जातो. महाराष्ट्रातील आदिवासी स्त्रीयांचे विवाहाचे वय सन १९९१ मध्ये १६.९ होते. यावरुन आदिवासी स्त्रियांचे समाजातील स्थान आणि समाजाचा स्त्रीबद्दलचा दृष्टीकोन लक्षात येते.

**लिंगगुणोत्तर प्रमाण**

आदिवासी स्त्रियांच्या दर्जाबद्दल विचार करतांना विवाहाच्या वयाबरोबरच लिंग गुणोत्तर (दर एक हजार पुरुषामागे स्त्रीयांचे प्रमाण) हा निकषही विचारात घ्यावा लागेल. महाराष्ट्रात १९६१, १९७१, १९८१, २००१ आणि २०११ मध्ये सर्वसामान्य लिंगगुणोत्तर अनुक्रमे ९३६, ९३०, ९३७, ९३४, ९२२ आणि ९२५ होते. तर आदिवासी लिंगगुणोत्तर ९७८, ९७२, ९७४, ९६८, ९७३ आणि ९७७ होते. यावरुन सर्वसामान्य स्त्रियांच्या तुलनेत आदिवासी स्त्रियांचे स्थान श्रेष्ठ असल्याचे दिसुन येते.

**जीवनसाथी निवडण्यचा अधिकार**

आदिवासी स्त्रियांना आपला जीवनसाथीदार निवडण्याचा पूर्ण अधिकार आहे. यात गोटुल किंवा युवागृह यासारख्या सांस्कृतिक केंद्राचा महत्वाचा वाटा आहे. सर्वच आदिवासी जमातीत युवागृह अस्तित्वात नाही, परंतु ज्या ठिकाणी अशी युवागृहे आहेत, त्या ठिकाणी मुलीला जमातीच्या चालीरिती, प्रथा संस्कृतीचे ज्ञान मिळते.

**हुंडा पद्धती व घटस्फोट**

आदिवासी समाजात स्त्रीचे महत्वपूर्ण स्थान असल्यामुळे मुलीला 'वधुशुल्क' देण्याची प्रथा आहे. इतर समाजात घटस्फोट मिळविण्यासाठी होणारी यातायात किंवा विलंब आदिवासी समाजात दिसून येत नाही. जीवनात विभिन्न क्षेत्रातील आदिवासीच्या स्थितीवरुन हे स्पष्ट होते की, त्यांची स्थिती पुरुषापेक्षा कसल्याही प्रकारची कमी नाही.

**स्त्री-भ्रुण हत्या**

हिंदुधर्माप्रमाणे कुटुंबात मुलगा असणे आवश्यक असते. कारण पित्याच्या मृत्युनंतर मुलगा पिंडदान करुन मुक्ती मिळविण्यासाठी उपयोगी पडतो. हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे मुलाला वडीलांची मालमत्ता मिळते, म्हणुन मुलगा वंशाचा दिवा अशी समजूत हिंदू धर्मात रुढ झालेली आहे, तर बेटी म्हणजे 'धनाची पेटी' अशी समजूत आदिवासीमध्ये दिसते. आदिवासीमध्ये मुलाच्या जन्माइतकाच मुलीचा जन्म आनंददायी मानला जातो. त्यामुळे गर्भलिंग निदान चाचण्या करुन मुलगी असेल तर तिची गर्भातच हत्या करण्योच पाप आदिवसी समाज करीत नाही.

**सारांश**

आदिवासी समाजातील लिंगगुणोत्तर, स्त्रियांचे कामातील सहभाग, कुटुंबातील निर्णयप्रक्रीयेतील सहभाग, स्त्रियांचे विवाहाचे वय, वधुमूल्य इत्यादीवरुन आदिवासी स्त्रियांचे आदिवासी समाजातील स्थान किंवा दर्जा सर्वसामान्य स्त्रियांच्या किंवा नागरी समाजातील स्त्रियांच्या तुलनेत श्रेष्ठ आहे. असे म्हणता येईल.

**संदर्भ सूची**

१) नरेंद्रकुमार वैद्य (२००३), जनजातीय विकास : मिथक एवं यथार्थ, रावत पब्लीकेशन, जयपुर पृष्ठ. ०५

२) माहेश्वरी गावित (२००८) आदिम जीवनाविष्कार, आनंदोत्सव प्रकाशन मंच, अहमदनगर. प.क्र. १४, ३०

३) राजनाथ शर्मा / राजेंद्र शर्मा (२००४) मानवशास्त्र एटलांटिक पब्लीकेशन अॅन्ड डिस्ट्रीब्युटर्स. नई दिल्ली प.क्र. ३६७

४) शेनक कुलकर्णी (२००९), महाराष्ट्रातील आदिवासी डायमंड पब्लीकेशन, पुणे प..१४

५) Census of India.

६) सुदर्शन देशमुख (२००७) आदिवासी समाजातील दारिद्र्य, निर्मल प्रकाशन, नांदेड